नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २०० Issue - 200 | वार शनिवार दि. ७ डिसेंबर २०२४ Blow- Saturday Date 7 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## नव्या कार्यकाळात आम्ही प्रकल्पांना वेगाने पुढे नेणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; ग्रीन एनर्जी व नदीजोड प्रकल्पांवर भर देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहेत. यानंतर त्यांनी शुक्रवारी डीडी सह्याद्रीला दिलेल्या मुलाखतीत महायुती सरकारचा पुढील पाच वर्षांचा विकास प्लॅन सांगितला आहे. तसेच जनतेचे आभारही मानले आहेत. ते म्हणाले, 'कालच्या शपथविधीतील जनसमुदाय पाहिला तर खूप आनंद झाला. जे यश जनतेने दिलं आहे, ते सेलिब्रेशन करण्याकरिता नाही. ते यश जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याकरिता दिलं आहे. मला खूप मोठ्या जबाबदारीची जाणीव झाली.' तसेच 'नव्या कार्यकाळात आम्ही प्रकल्पांना वेगाने पुढे नेणार आहोत. यावेळी माझा भर नदीजोड प्रकल्पावर असणार आहे. तर दुसरं म्हणजे ग्रीन एनर्जीवरही भर असणार



आहे,' असे फडणवीसांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीडी सह्याद्रीला विशेष मुलाखत दिली. यावेळी त्यांनी युती सरकारच्या प्राधान्यक्रमावर भाष्य केले. फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्र आता थांबणार नाही याचा अर्थ अडीच वर्षापूर्वी आमचं सरकार आलं तेव्हा आम्ही राज्याला ट्रॅकवर आणलं. आता सरकारच्या पुढच्या काळात चार नदीजोड प्रकल्पांवर माझा भर असणार आहे. यामुळं महाराष्ट्र कायम दुष्काळमुक्त होईल. तसेच ग्रीन एनर्जी-वर देखील माझा भर राहणार आहे. 'आपण ५४ हजार मेगावॅटचे वेगवेगळे प्रकल्प हातात घेतले आहेत. २०३० मध्ये ५२ टक्के वीज ग्रीन एनर्जीसारख्या पारंपारिक स्त्रोतातून असणार आहे,' असेही फडणवीस म्हणाले. 'यामुळे शेती आणि उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. दोन्ही क्षेत्रांमुळे महाराष्ट्रात रोजगाराची निर्मिती होईल आणि अर्थव्यवस्थेला विशेष चालना मिळेल, वेगवेगळ्या प्रकल्प तर हाती घेऊच पण या दोन गोष्टींवर विशेष भर असेल,' असे फडणवीसांनी अधोरेखित केले.

'मी २०१६मध्ये एक घोषणा केली होती. मुंबईच्या एमएमआर रिजनमधील कोणत्याही भागात एक तासात जाता आलं पाहिजे. पण आम्ही त्याच्यापुढे जात आहोत. कोस्टल रोड झाला, वर्सोवा सी-लिंकचंही काम झालं, वर्सोवा-मढचं टेंडर दिलं आहे, त्याचं काम सुरू होत आहे. मढपासून विरारपर्यंत सिलिंक तयार केलं आहे. जपान सरकारने प्रकल्पाला ४० हजार कोटी देण्याचं कबूल केले आहे. त्यामुळे मुंबईत वाहतुकीचा वेळ कमी होणार आहे. ३७५ किलोमीटरचं मेट्रो नेटवर्क करणार आहोत. पाच वर्षात हे ३७५ किमी मेट्रोचं काम सुरू केलं आहे, यामुळे मुंबईकरांच्या वेळेची बचत होईल आणि त्यांना क्वालिटी टाईमही मिळेल, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

## उकाड्यापासून दिलासा; थंडी पुन्हा परतणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : ऐन हिवाळ्यात राज्यात कमाल तापमान ३० अंशांवर तर किमान तापमान २० अंशांवर गेले आहे. उष्मा वाढल्यामुळे गेली तीन दिवस असह्य उकाड्याचा सामना करावा लागत आहे. मात्र, सोमवारपासून तापमानात चार ते पाच अंश सेल्सिअसने घट होऊन काहिसा दिलासा मिळणार आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, फेंगल चक्रीवादळामुळे राज्यात बाष्पयुक्त वारे आल्यामुळे ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. हवेत बाष्पाचे किंवा आर्द्रतेचे प्रमाण वाढून उकाडा वाढला होता. नाशिक, नगर, पुण्यात नऊ अंशांवर गेलेले किमान तापमान वाढून थेट १९ अंशांपर्यंत आले होते. तर कमाल तापमान राज्यभरात सरासरी ३० अंशांपर्यंत वाढले होते. आर्द्रता वाढल्यामुळे किमान तापमानात दहा अंश सेल्सिअसने वाढ झाली होती. कमाल तापमानातही सरासरी पाच अंश सेल्सिअसने वाढ झाली होती. त्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात असाह्य उकाडा जाणवत होता.

हवेतील आर्द्रता हळूहळू कमी होत आहे. पश्चिमी विक्षोप सक्रीय होण्याचा अंदाज आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्याचा जोर वाढून शनिवारपासून (७ डिसेंबर) तापमानात घट होण्यास सुरूवात होईल. सोमवारी (९ डिसेंबर) कमाल - किमान तापमानात चार ते पाच अंश सेल्सिअसने घट होऊन, थंडीत वाढ होईल. त्यामुळे सोमवारपासून राज्यभरात उकाड्यापासून काहिसा दिलासा मिळण्याचा अंदाज आहे, अशी माहिती हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिली. राज्यात शुक्रवारी चंद्रपूर येथे सर्वात कमी १७.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. सोलापूर येथे ३४.७ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. किनारपट्टीवर मुंबईत ३२.६, सांताक्रुज ३४.४, रत्नागिरी ३४.५ आणि डहाणूत ३०.१ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते. किमान तापमान चंद्रपूर खालोखाल नागपुरात २०.६, पुण्यात १९.८, नगरमध्ये २१.५, छत्रपती संभाजीनगरमध्ये २२.० आणि कोल्हापुरात २२.७ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

## कालिदास कोळंबकर हंगामी अध्यक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य विधानसभेत निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी, अध्यक्षांची निवड यासाठी उद्यापासून (शनिवार) विधानसभेच्या तीन दिवसीय अधिवेशनाला सुरुवात होत आहे. यासाठी भाजपचे ज्येष्ठ आमदार कालिदास कोळंबकर यांना हंगामी अध्यक्ष म्हणून शुक्रवारी शपथ देण्यात आली.

१५व्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनास शनिवारपासून सुरुवात होत आहे. शनिवार व रविवार अशा दोन दिवसांत सर्व २८८ सदस्यांचा शपथविधी पार पडेल. सोमवारी सकाळी विधानसभा अध्यक्षांची निवडणूक होईल. त्यानंतर राज्यपालांचे नवीन विधानसभेपुढे अभिभाषण होईल. अखेरच्या सत्रात पुरवणी मागण्या, विधेयके सादर केली जातील.

विधानसभेच्या अधिवेशनासाठी विधान भवनात रंगरंगोटी करण्यात आली आहे. प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यावर लॉबीचा भाग चकाचक करण्यात आला आहे. मावळते विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचीच अध्यक्षपदी फेरनिवड करण्यात येणार आहे. रविवारी ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील, असे सांगण्यात आले.

१५व्या विधानसभेत ७८ सदस्य हे पहिल्यांदाच निवडून आले आहेत. या नवीन चेहऱ्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे ३३, शिवसेना (एकनाथ शिंदे) १४, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ८, शिवसेना (उद्धव ठाकरे) १०, काँग्रेस ६ आणि राष्ट्रवादीच्या (शरद पवार) चार सदस्यांचा समावेश आहे. त्याशिवाय तीन अपक्ष व किंवा छोट्या पक्षांच्या सदस्यांचा समावेश आहे. सदस्यांना सभागृहात बोलणे किंवा भाषण करण्यासाठी ही शपथ घ्यावी लागते. विधानसभेतील सर्वांत ज्येष्ठ सदस्य कोळंबकर यांची हंगामी अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवनात झालेल्या छोटेखानी समारंभात शपथ दिली. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी उपस्थित होते. कोळंबकर हे शिवसेना, काँग्रेस व भाजप अशा तीन पक्षांकडून आतापर्यंत नऊ वेळा विधानसभेवर निवडून आले आहेत.

## भाजपाचे ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचं निधन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री मधुकर पिचड यांचं निधन झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. मधुकर पिचड यांना ऑक्टोबरमध्ये ब्रेन स्ट्रोकचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना



नाशिकमधील नाईन पल्स रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं. तेव्हापासून मधुकर पिचड यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र, आज (६ डिसेंबर) वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

मधुकर पिचड यांच्या निधनामुळे अकोले तालुक्यावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, मधुकर पिचड हे राज्याचे माजी मंत्री होते. अहिल्यानगर (अहमदनगर) अकोले विधानसभा मतदारसंघातून मधुकर पिचड हे तब्बल सात वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. तसेच मधुकर पिचड यांनी अनेक महत्वाची पदे भुषवली आहेत. तसेच आदिवासी विकास, वन व पर्यावरण मंत्री म्हणून देखील कार्यभार त्यांनी पाहिला होता. अकोले तालुक्यामधील विकासात मधुकर पिचड यांचं महत्वाचं योगदान मानलं जातं. दरम्यान, २०१९ मध्ये मधुकर पिचड यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता.

## आमच्यासाठी कोणत्याही धर्मग्रंथांपेक्षा महत्त्वाचं भारतीय संविधान असेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आज महापरिनिर्वाण दिन आहे. बाबासाहेबांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी लाखो अनुयायी चैत्यभुमीवर आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही चैत्यभुमीवर बाबासाहेबांना अभिवादन केलं. यादरम्यान इंदू मिलवरील बाबासाहेबांचं स्मारक कधी होणार आहे, त्याची तारीख आजच सांगा, अशी मागणी आरपीआय खरात गटाचे नेते सचिन खरात यांनी केली आहे. नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे स्मारक कधी होणार हे आजच सांगावं असंही खरात यांनी म्हटलं आहे. याबाबत देवेंद्र फडणवीसांनी भाष्य केलं आहे.

### महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

महामानव बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई येथे राष्ट्रीय स्मारक व्हावं अशी आंबेडकरी समाजाची इच्छा होती. त्यानंतर राज्यभर आंदोलन केल्यावर बाबासाहेबांच्या स्मारकाला इंदू मिलची साडे बारा एकर जागा मिळाली. आत नऊ वर्षे होऊनसुद्धा स्मारकाचं काम पूर्ण झालेलं दिसत नाही. आता नव्याने स्थापन झालेल्या महायुती सरकारचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज हे काम काम आणि कधी पूर्ण तयार होणार आजच आंबेडकरी जनतेला सांगावं, अशी मागणी सचिन खरात यांनी केली आहे. चैत्यभूमीवरील इंदू मिलवर स्मारक तयार करत आहोत. त्याला थोडा उशिर होत आहे, पण अत्यंत वेगाने ते आपल्याला पूर्ण करायचं असल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणाले. मला अतिशय आनंद आहे की, बाबासाहेबांच्या प्रत्येक आठवणीसोबत मला जुडण्याची संधी मिळाली. बाबासाहेब यांच्या जीवनाकडे पाहतो तेव्हा थक्क होतो. कारण एक व्यक्ती आपल्या जीवनामध्ये इतक्या गोष्टी कसे करू शकतात. मी तर असं म्हणेल ही व्यक्ती नाही तर संस्था आहे. पण अशा हजारो संख्या एकत्र केल्या तरी देखील बाबसाहेबांचं ज्ञान आणि व्यासंग पूर्ण होऊ शकत नसल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे. या देशाला एकच मार्ग महाशक्ती बनवू शकतो ते म्हणजे भारतीय संविधान, आमच्यासाठी कोणत्याही धर्मग्रंथांपेक्षा महत्त्वाचं भारतीय संविधान असेल. आम्ही सर्व आमच्या जीवनामध्ये आचरण करू. आपण महामानवाचे उपकार फेडू शकत नाही, जे काही कार्य करू ते संविधानारूप करू आणि काम करत असताना समाजातील शेवटचा व्यक्ती जो वंचित आहे त्याचा विचार करू, देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

### मालेगाव बँक खात्यांद्वारे कोट्यावधींचे गैरव्यवहार प्रकरण

### दोघांना केली अटक

## ईडीचे मुंबई व अहमदाबादमध्ये छापे, १३ कोटी ५० लाखांची रोख रक्कम जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मालेगाव येथील व्यापाऱ्याने दोन बँकांमध्ये १४ खाती उघडून त्यातील रकमेचा निवडणुकीसाठी कथित गैरवापर केल्याप्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) शुक्रवारी मुंबई व अहमदाबाद येथील सात ठिकाणी छापे टाकले. त्यात मुंबईतील अंगडिया व्यवसायिकाशी संबंधित एका ठिकाणाचा समावेश आहे. या कारवाईत १३ कोटी ५० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.

हा गैरव्यवहार १२०० कोटी रुपयांचा असल्याचा संशय असून बनावट कंपनीद्वारे २१ बँक खात्यांतून करण्यात आलेल्या ८०० कोटी रुपयांच्या व्यवहारांची माहिती ईडीला मिळाली आहे. त्यातील बहुसंख्य कंपन्या एकल मालकी असून त्या नवी मुंबई, सूरत,अहमदाबाद, उत्तर प्रदेश व दिल्ली येथील असल्याचे सूत्रांनी सांगितले.

या प्रकरणात राजकीय पक्ष व व्यक्तीच्या सहभागाबाबतही ईडी तपास करीत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मालेगाव येथील सिराज अहमद हारून मेमन याने नाशिकमधील दोन बँकांमध्ये सुमारे १४ बँक खाती उघडली होती. त्यातील गैरव्यवहाराप्रकरणी मेमनला स्थानिक पोलिसांनी अटक केली होती. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी या प्रकरणाला 'वोट जिहाद फंडिंग' गैरव्यवहार असे म्हटले आहे. तसेच या बेनामी बँक खात्यांमधून पैसे काढून निवडणुकीत गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. आरोपी सिराजने मालेगावमधील नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत अनेक बँक खाती उघडली होती. यामध्ये नागरिकांच्या केवायसी कागदपत्रांचा वापर करून त्यांनी शेतकऱ्यांना पैसे पाठवण्यासाठी नवा व्यवसाय सुरू करत असल्याचे भासवले होते. याप्रकरणी ईडीने शुक्रवारी अहमदाबाद येथील ६ व मुंबईतील एका ठिकाणी छापे टाकले आहेत. या कारवाईत मुंबईतील अंगडियाच्या ठिकाणावर छापे टाकण्यात आले आहेत. याप्रकरणी १३ कोटी ३० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.



याप्रकरणी ईडीच्या तपासानुसार, मालेगाव येथील १४ बँक खात्यांमधून एकल मालकी कंपन्याच्या २१ बँक खात्यावर ९५ कोटी रुपये जमा करण्यात आले होते.

तपासात नवी मुंबई, सूरत, अहमदाबाद, उत्तर प्रदेश व दिल्ली येथील २१ बनावट कंपन्यांची माहिती मिळाली असून त्यांच्या बँक खात्यात गेल्या तीन ते चार महिन्यात ८०० कोटी रुपये व्यवहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. तपासानुसार नागाणी अक्रम मोहम्मद शफी व वासिम वलीमोहम्मद भेसानिया यांनी बनावट खात्यामधून मोठ्या प्रमाणत रक्कम काढण्याचे समजते. तसेच मुंबई, अहमदाबाद व सूरतमधील हवाला व्यावसायिकांनीही या खात्यातील रक्कम काढल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे. ते मेहमूद भागड ऊर्फ चॅलेंजर किंग ऊर्फ एमडी याच्या सांगण्यावरून काम करत होते, असे चौकशीत सांगितले. त्यानुसार नागाणी अक्रम शफी व वासिम भेसानिया यांना ईडीने अटक केली आहे.

## संपादकीय....

### गुन्ह्याची व्याप्ती वाढली

मालेगाव येथील व्यापाऱ्याने दोन बँकांमध्ये १४ खाती उघडून त्यातील रकमेचा निवडणुकीसाठी कथित गैरवापर केल्याप्रकरणी सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) शुक्रवारी मुंबई व अहमदाबाद येथील सात ठिकाणी छापे टाकले. त्यात मुंबईतील अंगडिया व्यवसायिकाशी संबंधित एका ठिकाणाचा समावेश आहे. या कारवाईत १३ कोटी ५० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. हा गैरव्यवहार १२०० कोटी रुपयांचा असल्याचा संशय असून बनावट कंपनीद्वारे २१ बँक खात्यांतून करण्यात आलेल्या ८०० कोटी रुपयांच्या व्यवहारांची माहिती ईडीला मिळाली आहे. त्यातील बहुसंख्य कंपन्या एकल मालकी असून त्या नवी मुंबई, सूरत,अहमदाबाद, उत्तर प्रदेश व दिल्ली येथील असल्याचे सूत्रांनी सांगितले. या प्रकरणात राजकीय पक्ष व व्यक्तीच्या सहभागाबाबतही ईडी तपास करीत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मालेगाव येथील सिराज अहमद हारून मेमन याने नाशिकमधील दोन बँकांमध्ये सुमारे १४ बँक खाती उघडली होती. त्यातील गैरव्यवहाराप्रकरणी मेमनला स्थानिक पोलिसांनी अटक केली होती. भाजप नेते किरीट सोमय्या यांनी या प्रकरणाला 'वोट जिहाद फंडिंग' गैरव्यवहार असे म्हटले आहे. तसेच या बेनामी बँक खात्यांमधून पैसे काढून निवडणुकीत गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. आरोपी सिराजने मालेगावमधील नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत अनेक बँक खाती उघडली होती. यामध्ये नागरिकांच्या केवायसी कागदपत्रांचा वापर करून त्यांनी शेतकऱ्यांना पैसे पाठवण्यासाठी नवा व्यवसाय सुरू करत असल्याचे भासवले होते. याप्रकरणी ईडीने शुक्रवारी अहमदाबाद येथील ६ व मुंबईतील एका ठिकाणी छापे टाकले आहेत. या कारवाईत मुंबईतील अंगडियाच्या ठिकाणावर छापे टाकण्यात आले आहेत. याप्रकरणी १३ कोटी ३० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. याप्रकरणी ईडीच्या तपासानुसार, मालेगाव येथील १४ बँक खात्यांमधून एकल मालकी कंपन्याच्या २१ बँक खात्यावर ९५ कोटी रुपये जमा करण्यात आले होते. तपासात नवी मुंबई, सूरत, अहमदाबाद, उत्तर प्रदेश व दिल्ली येथील २१ बनावट कंपन्यांची माहिती मिळाली असून त्यांच्या बँक खात्यात गेल्या तीन ते चार महिन्यात ८०० कोटी रुपये व्यवहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले. तपासानुसार नागाणी अक्रम मोहम्मद शफी व वासिम वलीमोहम्मद भेसानिया यांनी बनावट खात्यामधून मोठ्या प्रमाणत रक्कम काढण्याचे समजते. तसेच मुंबई, अहमदाबाद व सूरतमधील हवाला व्यावसायिकांनीही या खात्यातील रक्कम काढल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे. ते मेहमूद भागड ऊर्फ चॅलेंजर किंग ऊर्फ एमडी याच्या सांगण्यावरून काम करत होते, असे चौकशीत सांगितले. त्यानुसार नागाणी अक्रम शफी व वासिम भेसानिया यांना ईडीने अटक केली आहे.

# मी भारतीय - डॉ बाबासाहेब आंबेडकर



विनोद पंजाबराव सदावर्ते
(समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००)

मी प्रथम भारतीय आणि अंतिमतः भारतीय आहे असे बोलुन देशातील प्रत्येक नागरिकांना एकच आणि समान ओळख निर्माण अर्थात भारतीय बनवणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच प्रखर राष्ट्रप्रेमी आहेत हे कोणीही नाकारू शकत नाही. भारतात अनेक जाती, धर्म, पंथ यामध्ये भेद व विचार अंतर असताना ही देशाला व देशातील करोडो लोकांना एकाच साखळी मध्ये बांधून घेतले ती साखळी मध्ये भारतीय. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा सारखा देशहित व समाजहित बघणारा नेता होण शक्य नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेण्यासाठी डोक्यात मानव कल्याण व देशहित पाहिजे. दुसऱ्या भाषेत समजून घ्यायचे तर डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेण्यासाठी मानसाची नितीमत्ता चांगली पाहिजे तरच बाबासाहेब आंबेडकर कळू शकतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने देश चालला आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित कार्य जर सरकारने केले तर भारत महासत्ता होण्यासाठी मुळीच वेळ लागणार नाही. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार समजून घेण्यासाठी आपल्याला राजकीय नेते व राजकीय नेत्यांची यंत्रणा बाजुला ठेवून एक जागृत माणूस म्हणून विचार करावा लागेल. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात मानसाच्या विकासाचे द्वार उघडण्यासाठी राजकारणा शिवाय दुसरी कोणतीही चाबी नाही. परंतु राजकारण्याच्या माध्यमातून स्वतःचे घरे भरून देशाला कंगाल करणाऱ्या राजकारण्यांनी राजकारणाला एवढे मलिन केले की लोकांचा राजकारणाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. राजकारण विकास, शिक्षण, आरोग्य व रोजगार या मुद्यावर व्हायला पाहिजे परंतु हे मुद्दे बाजूला सारून जाती धर्माला राजकारणात आणल्याने देशाचे व जनतेचे वाटोळे केले आहे. धुर्त राजकारण्यांनी धर्माला राजकारणात आणून देशाला पोकळ व जनतेला गुलाम केले आहे. जेथे मानसाला शिक्षण, आरोग्य, रोजगार व देशावर गर्व असायला पाहिजे तेथे लोकांना जर जाती आणि धर्मावर गर्व वाटत असेल तर देशाचा विकास कोणी करायचा? जाती धर्मावर गर्व करायला लोक राजकीय नेत्यांपासुन शिकले म्हणून देशावर व शिक्षणावर गर्व करायला करायला वेळच राहिला नाही किंबहुना त्याचे गांभीर्य राहिले नाही. जाती धर्माचे नारे देऊ राजकारण नसते तर शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि विकासावर राजकारण असायला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकर सुद्धा सत्तेमध्ये महत्वाच्या खात्यात मंत्री होते. पण बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकारणात असताना कार्य हे मानसाच्या व देशाच्या विकासाचे होते. शेतीला औद्योगिक दर्जा मिळण्यासाठी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावाची संकल्पना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचीच. नद्याजोड प्रकल्प संकल्पनेतून देशातील सर्व शेती पाण्याखाली आणुन शेतीचा विकास, नद्यावर धरणे बांधुन विद्युत निर्मिती तर मोठमोठे जलाशय तयार करून पर्यटन क्षेत्रात रोजगार निर्माण करण्याचे धोरण बाबासाहेब आंबेडकर देशाच्या व देशातील प्रत्येक व्यक्तीच्या हितासाठी आखतात. भारतीयांना जगात सर्वात स्वस्त विज देण्याचे नियोजन करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या च देशात विजेच्या दराने सर्वसामान्य माणसाचे जिवनमान विस्कळीत करून टाकावे ही शोकांतिका आहे. विद्यार्थ्यांनी जागृत होऊन गुणवत्तेचे शिक्षण घ्यावे तसेच जागृत बनून संशोधनावर लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जना सोबतच अर्थाजन करावे या सारखे मौल्यवान संस्कार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय विद्यार्थ्यांच्या मनात रुजवले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी, महिलांच्या न्याय हक्का साठी हिंदु कोड बिल तयार करून महिलांना पुरुषां प्रमाणे सर्व हक्क अधिकार देण्याचा प्रस्ताव करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर सर्वश्रेष्ठच ठरतात. कामगारांचे शोषण थांबवून कामगारांना कामाचे मर्यादित तास, योग्य मोबदला व इतर सुखसुविधा मिळवून देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर खऱ्या अर्थाने कामगारांचे उद्धारक आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य व विचार एका लेखा मध्ये, पुस्तकामध्ये मांडणे शक्यच नाही याची जाणीव असुनही या लेखाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खरे देशाचे हितचिंतक व उद्धारक कसे आहोत हे सांगण्याचा प्रयत्न करत आहे. शेतकरी, महिला, विद्यार्थी, कामगार यांच्या कल्याणाचे काम संविधान निर्मिती पुर्वी करून प्रत्येकाला माणसात आणण्याचे काम डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना देश व देशातील जनता यांची किती काळजी होती याची कल्पना येते. जेव्हा संविधान लिहण्याची जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर आली तर संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, बंधुता, न्याय, आणि मानवी स्वातंत्र्यासह हक्क अधिकार बहाल केले. माणसा माणसा मधील व स्त्रिपुरुषांमधील भेद बाजूला करण्यात सर्वांना समान केले. शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणे आणि शासकीय संपतीवर सर्वांचा समान हक्क निर्माण करून दिला. एवढे मोठे कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले ते समजण्यासाठी प्रचंड बुद्धिमत्ता असायला लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मंत्रीमंडळात अनेक खात्याचे मंत्री होते, आमदार होते, बॅरिस्टर होते, प्राध्यापक होते अनेक साधने कमाईने होते तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावर संपती नव्हती कारण बाबासाहेब आंबेडकर हे इमानदार सुद्धां होते. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणसंस्था सुरू केली तीही जनतेच्या नावाने करून दिली. अनेक वर्षे आमदार, मंत्री, वकील, प्राध्यापक म्हणून कमाई करणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कडे स्वतः ची जी कमाई यायची ती जनतेसाठी व देशासाठी खर्च करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि देशाचे महान असे संविधान लिहून देशातील करोडो लोकांना शिक्षण, रोजगार, हक्क अधिकार बहाल करून अधिकारी व श्रीमंत बनवणारे आणि ते संधिवात लिहण्याचे एकही रुपया न घेणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा दुसरा राष्ट्रभक्त निर्माण होणेच शक्य नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर फक्त मी भारतीय आहे असे बोलतच नव्हते तर त्यांचे विचार आणि कार्य भारत देशाच्या व भारतीय नागरिकांच्या उद्धारासाठी होते म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर सर्वश्रेष्ठ ठरतात. याच विचारावर जर राज्यकर्त्यांनी राज्यकारभार केला, जाती धर्मपेक्षा कर्माला महत्त्व दिले तर या देशाचा सर्वांगीण विकास होण्यापासून कोणीही थांबून शकत नाही. परंतु आजची परिस्थिती बघितली तर धुर्त राजकारणी जाती धर्मावर घोषणा देतात पण देशा बद्दल त्यांना काही घेणे देणे नाही. म्हणून राजकारणात गेलेले लोक श्रीमंत तर देश आणि देशातील लोक कंगाल झालेले आहेत. लोकांना शाळेपेक्षा जास्त मंदिर महत्त्वाचे वाटत आहेत, माणसापेक्षा पुतळे, तर कर्मापेक्षा धर्म महत्त्वाचे वाटत असल्याने देशात शिक्षण, रोजगार, आरोग्य, महागाई सारख्या समस्या निर्माण होऊन देशातील जनता त्रस्त तर देश कर्जबाजारी झाला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे देशात रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया निर्माण झाली आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने देशात आर्थिक परिस्थिती मजबूत केली. परंतु सत्तेचा दुरुपयोग करून धुर्त राजकारणी लोकांनी रिझर्व्ह बँकेलाच कंगाल केले. जाती धर्माच्या नावावर भडकवून देशाला व देशातील जनतेला कमकुवत करून गुलाम करण्याचे प्रयत्न सुरू आहेत तर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि विकासाचे राजकारण करून देशाला समृद्ध केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देशहिताचे काम करून देशातील करोडो लोकांचा उद्धार केला तरीही काही लोक मेंदुचा वापर न करता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना जातीत बंद करण्याचा प्रयत्न करून त्यांचे कार्य मर्यादित करू पाहत आहेत परंतु आज जे शिक्षण, रोजगार, पेंशन, महिलांना पुरुषां प्रमाणे पगार, सार्वजनिक ठिकाणी हक्क अधिकार, संपतीची वाटणी, मत देण्याचा अधिकार, निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार हे सर्व डॉ बाबासाहेब यांची देण आहे. म्हणुन डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच खऱ्या अर्थाने कर्माने आणि धर्माने भारतीय आहेत.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनांनिमीत्त त्यांच्या विचार व कार्याला वंदन..



## मैंदर्गी बीटचे क्रीडा स्पर्धा थाटात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनीधी : अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी बीट चे दिनांक चार व पाच दोन दिवस क्रीडा स्पर्धा संपन्न झाला ,या क्रीडा स्पर्धेत मैंदर्गी बीट मधील पाच केंद्र सहभागी झाले होते,

मोठा गट मुले व मुली लहान गट मुले व मुली असे लंगडी कबड्डी खो-खो व वैयक्तिक रनिंग चेस असे खेळ खेळवण्यात आले या खेळात विजेता व उपविजेता यांना दलित मित्र हनुमंतराव कट्टीमनी यांचे स्मरणार्थ समर्थ नगर अक्कलकोट येथील दलित मित्र फाउंडेशनचा वतीने २४ ट्रॉफी व २४ मेडल देण्यात आले सलग हा दुसरा वर्ष ट्रॉफी व मेडल वितरित करण्यात येत आहे.

मोठा गट लंगडी मैंदर्गी मुली . कबड्डी मोठा गट मुली नगोरे. खोखो मुली मोठा गट हत्ती कनबस.

मुले मोठा गट कबड्डी दहिटणेवाडी शाळा, लंगडी मोठा गट मुले नागोरे शाळा, मोठा गट खो खो हत्ती कडबस शाळा

लहान गट कबड्डी मुले तळेवाड शाळा, लंगडी लहान गट मुली सलगर कन्नड शाळा, खोखो लहान गट मुली नागुरे कन्नड कबड्डी लहान गट मुले सापळे शाळा, लंगडे लहान गट मुले हालहल्ली शाळा, खोखो लहान गट मुले हालहली शाळा १०० मीटर धावणे मुली मोठा गट मैंदर्गी मुली कन्नड सपना खेत्री, मुले कन्नड मुगळी शाळा साहिल आवटे, २०० मीटर धावणे मुली मोठा गट हत्ती कनबस शाळा लक्ष्मी हालकुडे, २०० मीटर धावणे मोठा गट मुले मुगळी मराठी साहिल आवटी, बुद्धिबळ मोठे गट मुली सापळे शाळा वैष्णवी चंद्रकांत घंटे, मोठा घट मुले सापळे शाळा आनंद बंदीछोडे १०० मीटर धावणे लहान गट मुली करता शाळा सलोनी माडजे, मुले मुस्तफा मंजलापुरे मैंदर्गी उर्दू शाळा. २०० मीटर धावणे लहान गट मुली करंजाळ भाग्यश्री माडजे . बुद्धिबळ लहान गट मुली साफळे वर्षा बंदीछोडे, मुले सापळे शाळा यस बंदी छोडे, या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना दलित मित्र कै हनुमंतराव कट्टीमनी यांचे स्मरणार्थ ट्रॉफी व मेडल मैंदर्गी बीटचे विस्तार अधिकारी श्री सोमशेखर स्वामी व श्री तुकप्पा नागोर यांचे शुभ हस्ते श्री इंद्रसेन पवार केंद्रप्रमुख श्री कृष्णात मोरे केंद्रप्रमुख श्री जीवराज खोबरे केंद्रप्रमुख श्री महांतेश्वर कट्टीमनी श्री श्रीसैल हदलगी श्री आप्पाशा विभुते श्री विजयकुमार तडकलकर आदिमानवरांचे उपस्थितीत पारितोषिक वितरण करण्यात आले,

या कार्यक्रम पार पाडण्यासाठी श्री रमेश रोजगार सर श्री महादेव पाटील सर श्री विजयकुमार गुंडद सर श्री अंबाराया उजनी सर श्री गुरुलिंगप्पा शिवणगी सर आदींनी परिश्रम घेतले.



## पंढरपूर यात्रा, सराईत गुन्हेगारावर कारवाई निवडणूक शांततेत पार पाडल्याबद्दल अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सराईत गुन्हेगारावर नियंत्रण मिळवून आंदोलनात आधुनिक यंत्रणेचा वापर केल्यामुळे कार्तिक वारी व विधानसभा निवडणूक २०२४ प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पडली पंढरपूर विभागातील पोलीस ठाण्याखालील गुन्हे अभिलेख तपासून पोलीस ठाणेदार यादी तयार करण्यात आली,

विभागीय गुन्हे अभिलेखा तपासून पोलीस शनिवार यादी तयार करून वाळू तस्कर, शरीराविषयी, मला विषयी, जुगार विषय तसेच दारू विषयी गुन्हेगारावर कायद्याचा धाक पंढरपूर शहर पोलीस ठाण्याकडून ६९ पंढरपूर तालुका २९६, २७ तसे करकम पोलीस ठाण्याकडून उपविभागीय विभागातून ४१६ सराईत गुन्हेगारावर कारवाई करून पंढरपूर मंगळवेढा या भागामध्ये त्यांना प्रवेश बंदी करून कारवाई करण्यात आली.

कार्तिक यात्रा व निवडणूक यामुळे यांना प्रवेश बंदी करण्यात आली. त्यांचे हक्क अबाधित घेऊन त्यांना पण मुस्कान लावण्यात आले.



वरील सराईत गुन्हेगारांच्या पंढरपूर शहर व तालुका मंगळवेढा हद्दीतील प्रवेश बंदी केलेली होणाऱ्या या संभाव्य गुन्हेगारी पुर्त्यावर अंकुश ठेवण्याचे यश आले व विभागाच्या निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडावी तसेच पंढरपूर उपविभागीय पंढरपूर शहर तालुका ठाण्याखाली एमडीए कायद्यांतर्गत झिरो एक वाळू तस्कर या जिल्हाधिकारी यांनी एक वर्षा विषयी येरवडा येथे तानबद्ध केलेली तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे झिरो चार टोळी प्रमुख टोळी सदरचा यांना झिरो सहा महिने कालावधी करिता तर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ६६ प्रमाणे १० सराईत गुन्हेगारांना यांना झिरो दोन वर्षाकरिता तसेच पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याकडील झिरो सहा सराईत गुन्हेगारांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे व करकम पोलीस ठाणे कडील झिरो एक गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली.

पंढरपूर उपविभाग कडून २१ तारीख गुन्हेगारांना संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील तडीपार करण्यात आले तसेच स्वराज योग्य नियंत्रण मिळवून बंदोबस्तात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे विधानसभा निवडणूक व कार्तिक वारे शांततेत पार पडल्याबद्दल पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पंढरपूर विभागाची उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर अर्जुन भोसले व शहर पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके व तालुका पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर ग्रामीण पोलीस निरीक्षक शिरीष हुंबे पोलीस कॉन्स्टेबल शंकर पटवारी व पंढरपूर उपविभागातील सर्व अधिकारी अंमलदार यांचे अभिनंदन करून त्यांना सन्मान पत्र देऊन गौरवण्यात आले आहे.

### बुधवार पेठेत रेव्ह. हरीभाऊ वाघमोडे पाटील प्रतिष्ठानतर्फे

## 'मार्ग हक्काचा, सन्मानाचा' या थीमवर जागतिक एड्स दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी : बुधवार पेठेत मागील १९ वर्षांपासून वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी व त्यांच्या मुलांसाठी कार्यरत असलेल्या रेव्ह. हरीभाऊ वाघमोडे पाटील प्रतिष्ठानतर्फे जागतिक एड्स दिनानिमित्त 'मार्ग हक्काचा, सन्मानाचा' या विशेष थीमवर आधारित एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश एचआयव्ही/एड्स आणि एसटीआय/एसटीडी प्रतिबंध याबाबत जागरूकता वाढवणे आणि समुदायाला सन्मान व आत्मसन्मानाचा मार्ग दाखवणे हा होता.

**श्रद्धांजली सत्रात एचआयव्हीमुळे मृत झालेल्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर जागृती सत्र घेण्यात आले, ज्यामध्ये एचआयव्ही/एड्स प्रतिबंध, आरोग्य तपासणीचे महत्त्व, आणि बाधितांसाठी उपलब्ध मदतकार्य याविषयी माहिती देण्यात आली. यासोबतच फ्री कंडोम वितरण करण्यात आले, ज्यामुळे सुरक्षित प्रथांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.**

रामेश्वर मार्केटच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात कँडललाइट मार्चने करण्यात आली, ज्यामध्ये एचआयव्ही/एड्समुळे मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर महिलांच्या आणि मुलांच्या स्वागत समारंभाने कार्यक्रमाला अधिक ऊर्जित स्वरूप मिळाले. आकर्षक रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये स्थानिक महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

कार्यक्रमादरम्यान सहभागींच्या सोयीसाठी नाश्ता दिला गेला आणि आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान, रेव्ह. हरीभाऊ वाघमोडे पाटील प्रतिष्ठानच्या प्रतिनिधी मिस सारिका लष्करे यांनी असे सांगितले की, आपल्या समाजाच्या दुर्लक्षित घटकांसाठी अशा उपक्रमांद्वारे पाठिंबा देणे आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. 'मार्ग हक्काचा, सन्मानाचा' ही थीम केवळ एका दिवसापुरती मर्यादित नसून, ती एक दीर्घकालीन विचारधारा आहे जी सन्मानपूर्वक जगण्यासाठी आवश्यक आहे.



रेव्ह. हरीभाऊ वाघमोडे पाटील प्रतिष्ठान समाजातील दुर्लक्षित वर्गाचे जीवनमान सुधारण्यासाठी कटिबद्ध आहे आणि एचआयव्ही/एड्सविरुद्धच्या कलंक आणि भेदभावमुक्त जगासाठी सतत कार्यरत आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेने सर्व समर्थक आणि सहभागींचे, विशेषतः संवाद फाउंडेशनचे, अलका ताई, सीमा ताई, आरतीताई, अमोल कांबळे, आकाश ससाणे सागर भाऊ चेतन भाऊ झख प्रतीक्षा शेडगे मॅडम यांचे आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेबाना अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रेणापूर/सुधाकर रणदिवे : रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर ता.रेणापूर जिल्हा,लातूर येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.रमाकांत गायकवाड, प्रा.रतन लहाने यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य शशिकांत ची-लरगे हे उपस्थित होते.या वेळी प्राचार्य,डॉ कैलास मटे , डॉ.हिरकन शेटकर, प्रा. उमेश रणदिवे, राधिका माने,ग्रंथपाल मनीषा लातूरकर, प्रा उत्तम दुधभाते यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापिका कु.गायत्री कातळे यांनी केले. तर प्रास्ताविक बी.एड छात्र अध्यापक.भंडारवाड गोविंद यांनी केले.प्रा. रमाकांत गायकवाड , प्रा रतन लहाने, प्रा.उमेश रणदिवे,डॉ.हिरकण शेटकर यांनी यावेळी विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य,शशिकांत चीलरगे यांनी केला.यावेळी कुमारी, वैष्णवी सुरवसे, धरती जाधव, रेणुका कुलकर्णी, यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन.छात्र अध्यापक ऋषिकेश शिंदे यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी बी एड व डी. एड च्या छात्र अध्यापक व अजय बद्दर, दत्ता चादरे यांनी सहकार्य केले.

# डॉ.आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय : मुख्याध्यापक वाजे

## डुबेरे येथील जनता विद्यालयात डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी – डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे होते.व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक सोमनाथ गिरी,अलका काळोगे,कचेश्वर शिंदे,रेखा खंडीझोड आदी उपस्थित होते. उपस्थितींच्या हस्ते डॉ .आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या जीवन व कार्याचा प्रणिती कडभाने विद्यार्थ्यांनीसह उपशिक्षक राजेंद्र गांगुर्डे यांनी करून दिला.यावेळी बोलतांना विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी आयुष्यभर कार्य केले. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम घेतले म्हणून त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते. जातीयभेद,सामाजिक विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केले . डॉ आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे म्हणून डॉ. आंबेडकर यांचा कार्याचा इतरांनी आदर्श यावा असे आव्हान वाजे यांनी शेवटी केले . सूत्रसंचालन सोमनाथ गिरी यांनी तर आभार विद्या ठाकरे यांनी मानले. यावेळी सीमा गोसावी, सोमनाथ बोडके, रोहिणी भगत,मारुती डगळे,शिवाजी गुरुळे , उत्तम कामडी,जयश्री गोहाड,रामदास वारुंगसे, वृषाली घुमरे, सोमनाथ माळी, आदींसह शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




# महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य व विचाराची प्रेरणा घेवून जगावे : रविशंकर इठूले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/गोदिंया : आपले जीवन हे महत्त्वाचे आहे. हे जीवन कसे जगावे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे जगावे.

### शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे अभिवादन कार्यक्रम साजरा

अभ्यास ही तसाच करावा जसे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घेत-ले. संपूर्ण मानव जातीला मुक्तता मिळावी यासाठी त्यांनी अतोनात प्रयत्न करुन अफाट कष्ट केले. त्यांचे उपकार कधिही फिटणार नाही. याची जाणीव सर्वांना असा-वी. म्हणून महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य व विच-ाराची प्रेरणा घेवून जगावे. असे प्रतिपादन मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांनी केले. ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

यावेळी मंचावर शिक्षिका नीता भलमे, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, स्वाती राणा, प्रगती खोब्रागडे, अर्चना चव्हाण ल तुषार महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रसंगी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. या अभिवादन कार्यक्रम साजरा करताना शालेय असित दुधे, प्रेरित बन्स-ोड, नैतिक गेडाम, रेयांश वालदे, विनय कोल्हे, समंथ भोवते, ओमेंद्र कांबळे, सुशांत वालदे, करण शह-ारे, चेतन चौधरी, ममीत वालदे, चैतन्य जनबंधू, अनुराग धमगाये, क्रीश जनबंधू या विद्यार्थ्यांनी भाषण व भीमगीत गायन करुन अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका अस्मिता तेलंग यांनी केले असून आभार मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.



# सामाजिक, न्याय, समता समानता व एकात्मता आणि अंखडता हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे : शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणजे विज्ञान मानवता व्यक्ति स्वातंत्र्याचे अखंड ऊर्जा स्रोत आसुन हा न संपणारा विषय आहे तत्त्व-ज्ञान विचारसरणी समता स्वातंत्र बंधुता आणि न्याय ही मानवी मूल्ये वृद्धिंगत करणारे आहेत जिथे माणसाला माणूस म्हणून जगता येत नसेल तिथे शोषणामुळे व प्रचंड विषमतेमुळे श्वास घेता येत नसेल तर ते डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मानवतेची किमया केली विषमतेला हादरा देण्यासाठी सामाजिक न्याय समानता एकात्मता एकता आणि अखंडता या देशाला दिली भारत देशाला बलशाली संविधान दिले म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर हे मानव मुक्तीचे प्रेरणेते आहेत असे प्रतिपादन नळदुर्ग येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह येथील अधीक्षक एम एस शिंदे यांनी केले . नळदुर्ग येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभा प्रसंगी बोलत होते या प्रसंगी वस्तीगृहाचे लिपीक बि आर मोटे सर्व कर्मचारी वृद्ध उपस्थित होते

नळदुर्ग येथे नालंदा बुद्ध विहारात तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले या प्रसंगी बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी त्रिशरण पंचशील दिले याचबरोबर डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले बुद्ध नगर भागात जी एम चौकात डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले इंदिरानगर डॉ आंबेडकर नगर मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्परून अभिवादन करण्यात आले यावेळी किशोर कोंडीबा बनसोडे , अभियंता अजयकुमार बागडे यूवा नेते योगेश सुरवसे , रिपाइंचे नेते दुर्वास बनसोडे , रिपाइचे नेते बाबासाहेब बनसोडे सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल बापू बनस-ोडे , राजेश बनसोडे , अतुल बनसोडे अमर बनसोडे , उत्तम कांबळे , शाम लोखंडे , सुरेश चिमणे , गणेश दूरुगकर , बापू दूरुगकर ऋषिकेश कांबळे , निशांत कांबळे , हमराज कांबळे , सुरज कांबळे पो कॉ मोरे , सिद्धार्थ सुरवसे , उमेश गायकवाड , आयाप्पा भांगे , दिलीप भांगे आनंद खारवे , अमित गायकवाड

सुरज मस्के सह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते .



### नळदुर्ग येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान चौका सह शहरात विविध ठिकाणी अभिवादन

# ५ डिसेंबर १९७१ च्या युद्धात विजय मिळाल्याबद्दल कोल्हापूरमध्ये ५३ वा थानपीर विजय दिवस मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नामदेव निर्मळे/टाकळीवाडी प्रतिनिधी : कोल्हापूर येथे थानपीर माजी सैनिक परिवार कोल्हापूर यांच्यावतीने ५ डिसेंबर १९७१ च्या युद्धात सहभाग घेतलेल्या सैनिकांचा सत्कार व शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्व-लन करून तसेच तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिमेचे पूजन, पंचशील करण्यात आला.

थानपीर योद्धा तसेच वीर शहिदांच्या परिवारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी थानपीर युद्धाचे अनुभव सांगण्यात आले. महार गाणं तसेच राष्ट्रगीत म्हणण्यात आले. तसेच शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती श्रीकांत नडगीरसो, बापू घाटगेसो, गोप-ाल कांबळेसो, अशोक बनसोडे, यांचा सत्कार करण्यात आला. युद्धामध्ये शहीद झालेले परिवार कै. आनंदा मोरे, व कै. विजेंद्र साबळे परिवारांचा सत्कार करण्यात आला.

प्रत्यक्ष अनुभव युद्धात घेतलेल्या जवानांनी अनुभव सांगितला. ५ दिवस अन्न ,पाणी ,शिवाय १३ महार रेजिमेंट यांनी पाकिस्तानबरोबर लढा दिला होता.

सिग्नल झाला. आला रे आला महार आला. अशा घोषणा देऊन मोठ्या प्रमाणात फायरिंग झाली. १९६६ यावर्षी १३ महार रेजिमेंट ची स्थापना झाली. या युद्धामध्ये ३२ जवान शहीद झाले होते. महार रेजिमेंटला दोन अवॉर्ड देण्यात आले. ५ डिसेंबर १९७१ हा थानपीर विजय दिवस म्हणून घोषित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी मनोरंजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये संगीत खुर्ची, बलून, कार्यक्रम घेऊन सांगता झाली. या कार्यक्रमाला कोल्हापूर,सांगली, सातारा, या जिल्ह्यातील सर्व आजी, माजी सैनिक ,परिवार उपस्थिती होता.

आयोजन, रमेश निर्मळे, सुधिर सरजामे, तुकाराम कांबळे, सुहास कांबळे, संदीप कांबळे, भीमराव बारामतीकर ,अशोक पवार ,शिवाजी धनवडे व थानपीर यूनिटचे सर्व माजी सैनिक यांनी हा कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




# जि.प.प्राथमिक शाळा वसंत नगर नळदुर्ग येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : भार-तरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जि.प.प्राथमिक शाळा वसंत नगर नळदुर्ग ता.तुळजापूर येथे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

वसंत नगर नळदुर्ग येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विकास कुलकर्णी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे जिल्हा समन्वयक तथा सामाजिक कार्यकर्ते पत्रकार एस.के.गायकवाड हे होते. प्रारंभी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे उप-स्थित मान्यवरांच्या हस्ते पुजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना एस.के. गायकवाड म्हणाले की,भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्य घटनेमुळे देशातील तमाम नागरिकांना त्यांचे मानवी अधिकार मिळाले असून विद्यार्थ्यांनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून उच्च शिक्षण पूर्ण करून प्रशासनातील अधिकारी होऊन शासनकर्ती जमात बनण्याचा प्रयत्न करावा हीच भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना खरी आदरांजली ठरेल.

यावेळी सहशिक्षक हरीद-ास सुर्वे, श्रीकृष्ण कुलकर्णी, दयानंद सोनवणे, अविनाश राठोड,सहशिक्षका व्ही. एल.वाघमारे,नेहा कुंभलकर, युवा केंद्र कार्यकर्ती आर. एस.राठोड,सह विद्यार्थ्यी उप-स्थित होते.या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन सहशिक्षक दयानंद सोनवणे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहशिक्षक अविनाश राठोड यांनी केले.

### या भूमिकेवर शेतकरी योद्धा कृषी समिती ठाम — आता काही झालं तरी चालेल पण माघार नाही

# एक तर पिक विमा द्या नाहीतर शेतकऱ्याच बलिदान घ्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : एक वर्ष झाले पीक विम्यासाठी सतत संघर्ष करावा लागतो संघर्ष तरी किती करावा . त्याला सुद्धा काही लिमिट आहे आम्ही आतापर्यंत शांत होतो पण आता शेतकऱ्याचा अंत पाहू नका

दिनांक ९ डिसेंबरला जवाब मांगों आंदोलन पुकारलेला होते . याच आंदोलनासाठी काल दिनांक ५/१२ रोजी पोलीस प्रशासन यांच्याकडून मोर्च्याची परवानगी मागितली याची माहिती उपविभागीय कार्यालय सिंदखेड राजा यांना माहिती मिळताच क्षणी प्रशासन खडबडून जागे झाले आणि दिनांक १० ऑक्टोबर रोजी सिंदखेडराजांमध्ये जवळपास ५००० हजार पेक्षा अधिक शेतकरी या मोर्चामध्ये सामील झाले होते या मोर्चाचे आयोजक शेतकरी योद्धा कृती समिती बळी वंश लोक चळवळ . युवा संघर्ष समिती सिंदखेड राजा होते मोर्चाच्या निवेदनात दिलेल्या मागण्याचं काय झालं व शेतकऱ्यांचे पीक विम्याच्या पावत्या दिल्या होत्या त्याचं पुढे काय केलं याचा जवाब विचारण्यासाठी हा मोर्चा आयोजित केला होता . यावर कार्यालयात आतापर्यंत कुठलीच माहिती संबंधित विभागाकडून आली नाही म्हणून शेतकरी योद्धा कृषी समिती व युवा संघर्ष समितीच्या वतीने ९ तारखेला भव्य मोर्चाचे आयोजन केले होते चर्चेमधून जर मार्ग निघाला नाही तर आम्ही आंदोलनावर ठाम आहे असं या निवेदनामध्ये उल्लेख केला होता या चर्चेसाठी जिल्हा कृषी अधीक्षक पिक विमा जिल्हा प्रतिनिधी सिंदखेड राजा मतदार संघाचे आमदार मनोज भाऊ कायंदे , त्या वेळेचे विद्यमान आमदार डॉक्टर राजेंद्रजी शिंगणे साहेब, देऊळगाव राजा तहसीलदार , तालुका कृषी अधिकारी देऊळगाव राजा सिंद-खेड राजा तहसीलचे तहसीलदार साहेब व तालुका कृषी अधिकारी सिंदखेड राजा यांना चर्चेसाठी बोलवावे अशी निवेदनामध्ये विनंती करण्यात आली होती पण .

उपविभागीय कार्यालयातून तात्काळ आदेश काढून संबंधित सर्व विभागा ला १२ डिसेंबर पर्यंत मुदत दिली तोपर्यंत तुम्ही या निवेदनावर तसेच मागण्यावर काय कारवाई केली. याची माहिती संबंधित विभागाला द्या. नाहीतर त्या बद्दलचा अहवाल जिल्हा अधिकारी कार्यालयाला देण्यात येईल असा इशाराच उपविभागीय अधिकारी कार्यालयाने दिली आहे .त्यामुळे आता १२ तारखेपर्यंत शेतकऱ्याच्या पदरात काय पडते याकडे सर्व बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे जर दिनांक १२ पर्यंत मार्ग निघाला नाही तर

पुढील आंदोलनाची तारीख १६ डिसेंबर वेळ दुपारी एक वाजता असेल याची सर्व शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी अशी माहिती शेतकरी योद्धा कृषी समितीने दिली आहे



## थोडक्यात...

### रिक्षाची दुचाकीला धडक; दोघे जखमी

सोलापूर, (प्रतिनिधी) : सोरेगाव येथील वृद्धाश्रमाजवळ रिक्षाने धडक दिल्याने दोघे जखमी झाल्याची घटना २ डिसेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी देविदास शिवराम शिंदे (वय-४६, रा.औराद,ता.दक्षिण सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून रिक्षा क्रमांक एम.एच.१३.सिटी.३२६७ चा चालक परमानंद नागप्पा माळी (रा.सोरेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे औराद येथून दुचाकी क्रमांक एम.एच.१३ डिएन.४८६३ वरून सोलापूरकडे येताना तेरामैल जवळ रिक्षा चालकाने त्याच्या ताब्यातील रिक्षा ही रस्त्याची परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अचानकपणे रस्त्याच्या उजव्या साईडला टर्न घेऊन फिर्यादीच्या मोटरसायकल धडक दिली. यात देविदास शिदे व सौरभ दोघे गंभीर जखमी झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल राठोड हे करीत आहेत.

# डॉ. आंबेडकर यांनी देशाला 'युद्ध नको बुद्ध हवा'चा संदेश दिला : प्रा. नामदेवराव गरड

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात महापरीनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : जागतिक राजकीय स्थिती कमालीची बिघडली आहे, तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने जगातील देशाची वाटचाल सुरू आहे. अशा स्थितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा युद्ध नको बुद्ध हवा हा संदेश मारक नव्हे तर तारक ठरेल, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक प्राध्यापक नामदेवराव गरड (कुर्डूवाडी) यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, इतिहास अभ्यास मंडळ व राज्यशास्त्र अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.. अध्यक्षस्थानी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी होते तर व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, प्रा मधुबाला लोणारी, प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, डॉ आंबेडकर यांनी संत गाडगे महाराज यांच्याकडून स्वच्छता व शांततेची शिकवण घेतली, गौतम बुद्धामुळे त्यांनी शांततेचा मार्ग अवलंबला, त्यानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार करून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व हे त्रिसूत्री शिकवण त्यांनी दिली. आता त्यांच्या शिकवणुकीचा विसर पडत असून समाजामधील जातिवाद वाढला आहे. वर्चस्वाची लढाई जोर धरत आहे. देश विदेशामध्ये युद्धाचे प्रसंग उद्धवत आहे, जाती व्यवस्था विकोपाला गेली आहे. यावर मात करण्यासाठी डॉ आंबेडकर यांची विचारसरणी आत्मसात करणे हा एकमेव उपाय आहे.

प्राचार्य भरमशेट्टी म्हणाले की, प्रत्येक जाती-धर्माला न्याय देण्याचे कार्य आंबेडकर यांनी केले. त्यामुळे पुरोगामी समाजाची निर्मिती




झाली. परंतु आता आरक्षणावरून समाजामध्ये दरी निर्माण झाली आहे. यातून मार्ग काढण्यासाठी डॉ आंबेडकर यांचे विचार उपयुक्त आहे.

प्रारंभी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना मान्यवरांनी वंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले. सूत्रसंचलन प्राध्यापिका शितल झिंगाडे यांनी केली तर आभार प्रा राजशेखर पवार यांनी मानले. कार्यक्रमास प्रा मनीषा शिंदे, प्रा शितल फुटाणे, प्रा जनाबाई चौधरी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा येथे महापरिनिर्वाण दिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : सुधाकर रणदिवे, दि.६ तालुक्यातील माळकरंजा येथील जि.प आदर्श प्राथमिक शाळेत महापरिनिर्वाण दिनी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला वंदन करून अभिवादन करण्यात आले.

इयत्ता सहाव्या वर्गातील मुलांनी मराठी विषयातील पाठ बाल सभा हा यावेळी प्रात्यक्षिक स्वरूपात सादरीकरण केले आणि क्रांती सुर्याच्या जीवनातील विविध प्रसंग सांगुन संपूर्ण जीवन पट उलगडून दाखवला. शाळेतील विद्यार्थीनी कु सुप्रिया सतीश मोरे हिने सुत्रसंचालन करताना प्रज्ञा रत्न बाबासाहेब यांच्या बद्दल शेरोशायरी करत कार्यक्रमात रंगत आणली. आकांक्षा मुळे, इश्वरी मुळे, सत्यजित क्षिरसागर, यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील प्रसंग सांगितला तर श्लोक मोरे आणि राज धोंगडे यांनी गीताच्या माध्यमातून बाबासाहेब व्यक्त केले. शाळेतील शिक्षक श्री. संजय ओव्हाळ, हनुमंत घाडगे, श्रीमती भारती सुर्यवंशी व मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी कु. मंजुश्री कराड यांनी आपले विचार व्यक्त



केले. शाळेचे मुख्याध्यापक तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री संतोष भोजने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध गुणांचा समरोप करून प्रत्येक विद्यार्थ्यांने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या गुणांचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले. चि. मंदार मनोज माळी याने आभार मानले.

# आरोग्यासाठी एक पाऊल खेळाकडे : प्रशांत आरबाळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : खेळात हार जीत गौण आहे.उत्तम आरोग्यासाठी मैदानी खेळाची गरज आहे ज्याप्रमाणे मानसिक भावनिक विकासाबरोबर शारीरिक विकासाची गरज आहे आधुनिक काळात उत्तम आरोग्यासाठी एक पाऊल खेळाकडे गरज आहे असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी व्यक्त केले गौडगाव पंचाचार्य प्रशालेत अक्कलकोट बीटस्तरीय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी केंद्रप्रमुख सुरेश शटगार भीमाशंकर धडके मुख्याध्यापक



कल्याणी देशट्टी क्रीडाशिक्षक परमेश्वर व्हसुरे आदी मान्यवर उपस्थित होते.या बीटस्तरीय स्पर्धेत कडबगाव , नागणसूर तोळनुर, दुधनी व उडगी अशा पाच केंद्रातील खेळाडू शिक्षक उपस्थित होते.या स्पर्धेला पंच म्हणून नागराज कलबुर्गी एकनाथ मोसलगी अनिल इंगळे रमेश सोनकर नीलकंठ शिंगे तानाजी चव्हाण जितेंद्र जाजु समीर शेख पवार आदीनी काम पाहिले.

# भारतीय संविधानाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संविधान चषक २०२४ चे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोला: भारतीय संवीधनाला लागू होऊन ७५ वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्य साधुन अमृतमहोत्सवी साजरे करत असताना स्थानीक आरटीओ ग्राउंड, खडकी, कौलखेड येथे मुंबई येथे कार्यरत अकोल्याचे सुपुत्र राज्यकर अधिकारी श्री. विनोद विरघट सर, बिसीसी क्रिकेट क्लब, चॅम्पियन्स क्रिकेट क्लब यांचे संयुक्त विद्यमाने एक दिवसीय संविधान चषक टेनिस बॉल टुर्नामेंट चे आयोजन रविवार दिनांक ०१ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते. या टुर्नामेंट मध्ये ऍडव्होकेट क्रिकेट टीम अकोला, दानापुर येथील संघर्ष क्रिकेट टीम, सिंधी कॅम्प येथील चॅम्पियन्स क्रिकेट टीम, तसेच खडकी-कौलखेड येथील बहुमत क्रिकेट क्लब ची टीम व टीम इ अश्या धुरंधर संघांनी सहभाग घेतला होता. टुर्नामेंट च्या पहिल्या सामन्यात बीसीसी विरुद्ध बिसीसी इ झालेल्या सामन्यात बीसीसी टीम ने निसटता विजय मिळवत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. या सामन्यात सुमेघ सरांनी आपल्या फलंदाजीची चमक दाखविली. तर दुसऱ्या सामन्यात चॅम्पियन्स क्रिकेट टीम ने ऍडव्होकेट टीम चा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळविला.

दरम्यान सुमेद घनबहादुर साहेब हेसुद्धा खेळाडूच्या विनंतीस मान देऊन उपस्थित राहिले त्यांच्या हस्ते खेळाडून मेडल प्रदान करण्यात आली ज्यामुळे खेळाडूना प्रोत्साहन मिळाले व खेळाडूना संविधांनाचे महत्त्व विषद केले

त्यांनतर बीसीसी टीम व दानापुरच्या संघर्ष क्रिकेट टीम मध्ये झालेल्या सामन्यात संघर्ष क्रिकेट टीम ने दणदणीत विजय मिळवित अंतिम फेरीत प्रवेश केला तर दुसरीकडे चॅम्पियन्स टीम ने सुद्धा अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात चॅम्पियन्स टीम ने दणदणीत विजय मिळवित सलग दुसऱ्यांदा संविधान चषक पटकाविला.

अंतिम सामन्याच्या बक्षीस वितरण सोहळ्याच्या वेळी आरटीओ चे अधिकारी श्री. शेळके साहेब, भावी नगरसेवक श्री. कुणाल शिंदे व राज्यकर अधिकारी अधिकारी श्री विनोद विरघट सर उपस्थित होते. यावेळी विजेत्या व उपविजेत्या संघाला मान्यवरांच्या हस्ते चषक प्रदान करण्यात आला व टुर्नामेंट मध्ये सहभागी प्रत्येक खेळाडूचा मेडल देऊन सत्कार करण्यात आला. टुर्नामेंट मधील उत्कृष्ट गोलंदाज म्हणून संघर्ष क्रिकेट टीम च्या गौरव याची तर उत्कृष्ट फलंदाज म्हणून चॅम्पियन्स टीम च्या रुपेश याची निवड करण्यात आली व त्यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. तसेच हॅटट्रिक घेतल्याबद्दल संघर्ष क्रिकेट टीम च्या गौरव वानखडे याचा रोख ५००/- देऊन गौरव करण्यात आला. टुर्नामेंट मध्ये पंच म्हणून, संदीप सर, सुमेघ सर, सुशांत देशमुख सर, उमेश राठोड सर यांनी काम पाहिले. तर समालोचक म्हणुन सुशांत देशमुख सर, सुमेघ सर, भगत सर यांनी काम पाहिले टुर्नामेंट च्या यशस्वी आयोजनासाठी सागर फेरन साहेब (पो उप निरीक्षक), अवधूत सर ग्रामविकास अधिकारी), विनोद विरघट सर, अतुल गवई (सरकारी वकील), नरेंद्र जांगिड, सागरभाऊ सटवाले, मा. लेनिन ढाले सर, विशालभाऊ धुळे, सुनील तगरे, शरद वाघ, किशोर पुंडे, सुमेघ सर, रोशन पातोंड ,संजूभाऊ दिनेश नागे, आशिष कांबळे , निरंजन वरणकार धीरज भाऊ, संजय जांगिड, रूपेश गायकवाड, अमित बाजपाई,सचिन ठाकूर, आदर्श ठाकूर,सौरभ तिवारी, ऋषी पिंजरकर, गोकुळ चव्हाण, प्रसाद तेलंग , अंकुश इंगळे, निखिल पारसकर, राजकुमार शर्मा, शुभम व्यादंडे,एस पी भगत, बिसीसी टीम, चॅम्पियन टीम च्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

**पोलीस पथकाची कारवाई**

**शेतकऱ्यावर गुन्हा दाखल**

# पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव येथील डाळिंबीच्या बागेत सापडली गांजाची झाडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव एका शेतकऱ्याने आपल्या डाळिंबीच्या बागेत शासनाने प्रतिबंधित केलेल्या मागणी बेकायदेशीर झाडांची अधिकृतपणे लागवड केल्याने त्या ठिकाणी पोलीस पथकाने कारवाई करून सुमारे २६ किलो ११६ ग्रॅम वजनाचा प्रतिबंध गांजा ज्याची बाजारभावाने दोन लाख ६३ हजार ३२७ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केल्याने अवैद्य धंदेवाल्यासह शेतकऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली.

याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अधिक माहिती अशी की पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव येथे राजेंद्र कालिदास पवार यांच्या शेतात डाळिंबीच्या बागेमध्ये बेकायदेशीरपणे गांजाच्या झाडांची लागवड केल्याची माहिती पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर अतुल भोसले यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळाली. व सदरच्या माहितीची खातरजमा करून



पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके स्थानिक गुन्हे शाखा शहर व तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे

पोलिसांनी पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बागेत जाऊन केलेल्या कारवाईने अनेकांचे दावेदनांनी असून त्यापूर्वी पोलिसांनी अशा प्रकारे कारवाई करून संबंधितावर गुन्हे दाखल केल्याचे पोलिसांनी केलेले या कारवाईमुळे शेतकऱ्यांना खळबळ उडाली असल्याचे समजते.

कारवाईसाठी पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके तसेच शहर व ग्रामीण पोलिसांची पथक तयार करून माहिती मिळालेल्या ठिकाणी पाठवण्यात आले व गोपनीय खोबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी पोलीस पथक पोहोचल्यानंतर त्यांनी राजेंद्र कालिदास पवार यांचे शेतातील डाळिंबीचे बागेत जाऊन कारवाईंनी पाहणी केली असता तिथे ठिकठिकाणी सातपुते चार फूट उंचीची गांजाची झाडे असे समजलेले दिसून आले त्या ठिकाणी एकूण १४ झाडे असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

दरम्यान सदर आरोपी राजेंद्र कालिदास पवार यांनी मौजे उंबरगाव तालुका पंढरपूर येथील आपले जमिनीवर गट नंबर १८६ मध्ये बेकायदेशीर रित्या प्रतिबंधात असलेली वरील वर्णनाची २५ किलो ७६८ ग्रॅम वजनाची गांजाची झाडे व ३४८ ग्रॅम मुका गांजा असा एकंदरीत २६ किलो १६६ ग्रॅम वजनाचा गांजा असले की अंदाजी किंमत रुपये दोन लाख ६३ हजार ४२७ व मादक उप असणाऱ्या प्रतिबंधात्मक गांजा बेकायदेशीर अधिकृतपणे लागवड केलेली दिसून आल्या सदर ओला तसेच सुका गांजा होण्याची तपासणी करी जप्त करून आरोपी राजेंद्र कालिदास पवार राहणार उंबरगाव पण तालुका पंढरपूर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम कुमार यावलकर व उप विभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके पोलीस भारत वाघे साहेब पोलीस विजय गायकवाड शरद कदम पोलीस सुरज हेंबाडे पोलीस नाईक सचिन हेंबाडे पोलीस नाईक माने पोलीस संजय राऊत पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे आणि पोलीस पाटील पोलीस मिसाळ नेस पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे यांनी केली आहे.**

# बसवेश्वर फिलॉसॉफिकल व कल्चर संघा मार्फत चेंबूर, मुंबई येथे कर्नाटक राज्योत्सव बालदिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नोव्हेंबर, ३०,२०२४ शनिवार रोजी बसवेश्वर फिलोसोफकल व कल्चर संघ चेंबूर येथे कर्नाटक राज्योत्सव व बालदिना निमित्त अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

संघाचे कार्यदर्शी शरण श्री.एन.बी. सावळासंग यांनी प्राथमिक करून आलेल्या पाहुण्यांचे स्वागत केले. नंतर दीप प्रज्वल करून कार्यक्रमाला आलेले प्रमुख पाहुणे जेष्ठ कलाकार कर्नाटक राज्योत्सव विजेता-२०१९ शरण श्री.जी.एम. मुनवळी यांचा उपस्थितीत सुरुवात झाला.

नंतर महिलामंडळा तर्फे प्रार्थनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. विद्यार्थ्याकरिता चित्रकला, भाषण, नृत्य, वेशभूषा, गायन असे विविध स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेतील प्रथम, तृतीया व तृतीय क्रमांकाच्या




मानक-यांना पाहुण्यचे हस्ते सन्मानचिन्ह व बक्षीस वितरण करण्यात आले.

सत्कार श्री.एम.एम.कोरी यांनी प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ देऊन केला. तसेच सर्व स्पर्धेतील परीक्षकांना देखील स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आजचे बालक उदयाचे देशाचे नागरिक आहेत विद्यार्थ्यांचे सुप्तकलागुण शोधण्याकरिता अशा प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

असे सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संघाचे कामाचे कौतुक केले. सर्व स्पर्धक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कला प्रदर्शन करून उपस्थित प्रेयकांचा मने जिंकली. श्री. शिवानंद अमरखेड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्यंत रंजनात्मक पद्धतीने केले.

बालकलाकार विबोधी यादव वय वर्ष दहा हिने भाषण, नृत्य व गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून प्रेक्षकांना तल्लीन केली. संघाचे सदस्य, समितीचे सदस्य, विद्यार्थी व पालक यांनी कार्यक्रम यशस्वी घेण्याकरिता मोलाचे योगदान दिले. आभारप्रदर्शन शरण श्री. अमरीश पाटील सर यांनी केले शेवटी महाप्रसादाने कार्यक्रम संपन्न झाला.